# महाराष्ट्र शासन

**विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण,कोकण विभाग,पनवेल**
**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर,पनवेल,जि.रायगड -४१०२०६**

ई-मेल पत्ता:jtdire.१११५@gmail.com दुरध्वनी व फॅक्स नंबर(०२२)२७४५३८२०

क्र.विससं/उशि/कोविप/ कार्यालयीन परिपत्रक/२०२५-२६/ e-office व्दारे

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय- विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण पनवेल या कार्यालयात सादर करण्यात येणाऱ्या सेवानिवृत्ती वेतन प्रकरणांबाबत तसेच भविष्य निर्वाह निधी प्रकरणांबाबत**

**संदर्भ-** १) म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.संकीर्ण -२०२३/प्र.क्र.४/सेवा ७ दिनांक ०१/०८/२०२५
३) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ नियमावली नुसार

म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र.१२३ (४) नुसार सेवानिवृत्ती पूर्वी ६ महिने अगोदर सेवानिवृत्ती वेतन प्रकरण महालेखापाल कार्यालयास सादर करणे आवश्यक असताना, विभागीय सहसंचालक विभागात सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे सादर करताना कालमर्यादेचे बंधन पाळले जात नसून कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर प्रकरण सादर करण्यात येते. तसेच महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ नियमावली नुसार सेवानिवृत्ती पूर्वी ३ महिने अगोदर भविष्य निर्वाह निधी प्रकरणे कार्यालयास सादर करणे आवश्यक असताना देखील सेवा निवृत्ती झाल्यानंतर भविष्य निर्वाह निधी प्रकरणे कार्यालात सादर केली जातात.

उपरोक्त परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण पनवेल यांच्या अधिनस्त विभागातील व अखत्यारितील महाविद्यालयातील सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे मा. महालेखापाल कार्यालयास कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्ती पूर्वी ६ महिने मा. महालेखापाल कार्यालयास पाठविली जातील याबाबत दक्षता घेण्यात यावी. तसेच भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ अन्वये भविष्य निर्वाह निधी प्रकरणे हि सेवा निवृत्ती पूर्वी ३ महिने अगोदर सादर करण्यात यावी.जेणे करून कर्मचाऱ्यांची सेवा निवृत्ती वेतन प्रकरणे वेळेत निकाली काढणे शक्य होईल तसेच कर्मचाऱ्यास सेवानिवृत्ती नंतर सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ तसेच भविष्य निर्वाह निधीचा लाभ विहित वेळेत अदा करणे शक्य होईल.सबब सर्व महाविद्यालयांनी परिपत्रकामध्ये देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल या बाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी निवृत्ती वेतन तसेच अंतिम भविष्य निर्वाह निधी प्रकरणे प्रलंबित राहिल्यास महाविद्यालयाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राचार्य यांची सर्वस्वी जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

Signed by
Kirankumar Laxmanrao Bondar
Date: 25-11-2025 15:34:02
**विभागीय सहसंचालक**
**उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल**

टिप- प्रस्ताव परिपूर्ण सादर करण्याकरिता आवश्यक कागदपत्रांची सूची कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.